Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

# दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

| मंगळवार, दि. ५ मे २०२६ | वर्ष १ | अंक ३० | पाने २ |
DIGITAL EDITION

नवापूरात 'बर्ड फ्लू'चा कहर!
(पान २ वर)



## निवडणुकीत नवे काय? : बंगाली जनतेने प्रथमच भाजपला दिली सत्ता, तामिळमध्ये नवा 'सुपरस्टार' राजकारणाचा 'हीरो'

**पश्चिम बंगाल** — २०६ भाजप; २९४ एकूण जागा; १४८ मॅजिक फिगर

| पक्ष | विजय | २०२१ | +/- |
|---|---|---|---|
| भाजप | २०६ | ७७ | +१२९ |
| तृणमूल | ८१ | २१३ | -१३६ |
| काँग्रेस | ०२ | ०० | +०२ |
| इतर | ०३ | ०२ | +०१ |

**तामिळनाडू** — १०७ टीव्हीके; २३४ एकूण जागा; ११८ मॅजिक फिगर

| पक्ष | विजय | २०२१ | +/- |
|---|---|---|---|
| टीव्हीके | १०७ | ०० | +१०७ |
| द्रमुक+ | ७४ | १५९ | -८५ |
| अद्रमुक+ | ५३ | ७५ | -२२ |
| इतर | ०० | ०० | ०० |

**केरळ** — ९७ यूडीएफ; १४० एकूण जागा; ७१ मॅजिक फिगर

| पक्ष | विजय | २०२१ | +/- |
|---|---|---|---|
| यूडीएफ | ९७ | ४० | +५७ |
| एलडीएफ | ३५ | ९३ | -५८ |
| एनडीए | ०३ | ०० | +०३ |
| इतर | ०५ | ०७ | -०२ |

**आसाम** — ९२ एनडीए; १२६ एकूण जागा; ६४ मॅजिक फिगर

| पक्ष | विजय | २०२१ | +/- |
|---|---|---|---|
| एनडीए | ९२ | ६९ | +२३ |
| काँग्रेस+ | २१ | ३० | -०९ |
| यूडीएफ | ०२ | १६ | -१४ |
| इतर | ११ | ११ | ०० |

**पुद्दुचेरी** — १८ एनडीए; ३० एकूण जागा; १६ मॅजिक फिगर

| पक्ष | विजय | २०२१ | +/- |
|---|---|---|---|
| एनडीए | १८ | १६ | +०२ |
| काँग्रेस+ | ०६ | ०८ | -०२ |
| टीव्हीके | ०३ | ०० | ०३ |
| इतर | ०३ | ०६ | -०३ |

### "दीदी, टाटा, बाय-बाय!" - 5 पैकी 3 ठिकाणी सत्तांतर; केरळमध्ये डाव्या आघाडीची सत्ता संपुष्टात

# पाच राज्यांच्या निवडणुकीचा निकाल: भाजपची मुसंडी!

## पश्चिम बंगालमध्ये १५ वर्षांच्या 'ममता पर्वा'चा अस्त; भाजपचा दणदणीत विजय

करण (गुरु) शिंदे
जन सम्राट टाईम्स

**मुंबई | देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर तीन राज्यांत सत्तांतर होत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. सर्वाधिक लक्ष वेधून घेणाऱ्या पश्चिम बंगालमध्ये प्रथमच भारतीय जनता पक्ष बहुमताने विजयी झाला असून, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची 15 वर्षांची सत्ता गेली आहे. तर, तामिळनाडूमध्येही मोठा राजकीय उलथापालथ होताना दिसत आहे. अभिनेता विजय थलपती यांच्या टीव्हीके पक्षाने जोरदार कामगिरी करत राज्यातील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदय केला आहे. थलपतीसमोर डीएमके आणि एआयडीएमके पक्ष मागे पडले असून, टीव्हीकेला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. जयललिता यांच्यानंतर तामिळनाडूत पुन्हा एकदा एका अभिनेत्याचा राजकीय उदय झाल्याचे पहायला मिळाले. केरळमध्ये डाव्या आघाडीची सत्ता संपुष्टात आली असून, काँग्रेस आघाडीने स्पष्ट बहुमत मिळवले आहे.**

दरम्यान, आसाममध्ये भारतीय जनता पक्षाने सलग तिसऱ्यांदा सत्ता कायम राखली आहे. तर पुदुच्चेरीत एआयएनआरसी आणि भाजप युतीने पुन्हा एकदा बहुमत मिळवत सत्ता स्थापन करण्याची तयारी सुरू केली आहे. मुख्यमंत्री एन. रंगासामी यांच्या नेतृत्वावर मतदारांनी पुन्हा विश्वास दाखवला आहे. पश्चिम बंगालच्या राजकारणात एक ऐतिहासिक परिवर्तन घडून आले आहे. गेल्या १५ वर्षांपासून सत्तेत असलेल्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला मतदारांनी नाकारले असून, भारतीय जनता पक्षाने 'बंपर' विजयासह बंगालचा गड सर केला आहे. "दीदी, टाटा बाय-बाय!" म्हणत बंगालच्या जनतेने परिवर्तनाला कौल दिला आहे. ममता बॅनर्जी यांचा पराभव हा केवळ एका निवडणुकीतील हार नसून, तो बंगालच्या राजकारणातील एका मोठ्या 'शिफ्ट'चा संकेत आहे. महिला मतदारांची पाठफिरवणी, भ्रष्टाचाराचे आरोप आणि ढासळलेली कायदा-सुव्यवस्था यामुळे तृणमूलचा बालेकिल्ला कोसळला आहे. भाजपने पूर्वेकडील हा आपला अंतिम गड सर करून भारतीय राजकारणात स्वतःचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.



### तृणमूलच्या पराभवाची प्रमुख कारणे

1 ममता बॅनर्जी यांच्या पराभवाचे सर्वात मोठे कारण म्हणजे 'आरजी कर मेडिकल कॉलेज'मधील बलात्कार आणि हत्या प्रकरण ठरले. या घटनेनंतर संपूर्ण बंगालमध्ये, विशेषतः महिला आणि तरुण मतदारांमध्ये प्रचंड संताप होता. सरकारने हे प्रकरण हाताळताना दाखवलेली असंवेदनशीलता आणि त्यानंतर डॉक्टरांनी केलेले मोठे आंदोलन यामुळे ममता बॅनर्जी यांची 'महिला रक्षक' ही प्रतिमा डागाळली गेली.

### आय-पॅक'वरील वरील छापे

2 निवडणुकीच्या ऐन धामधुमीत तृणमूलची निवडणूक रणनीती सांभाळणाऱ्या 'आय-पॅक' या संस्थेवर पडलेले छापे पक्षासाठी मोठे नुकसानकारक ठरले. या छाप्यांमुळे तृणमूलची संपूर्ण रणनीती आणि नियोजन विस्कळीत झाले. केंद्रीय यंत्रणांच्या या कारवाईमुळे पक्षाच्या अंतर्गत गोटात भीतीचे आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले, ज्याचा थेट फायदा भाजपला मिळाला.

### मुर्शिदाबाद हिंसाचार आणि बिघडलेली कायदा-सुव्यवस्था

3 मुर्शिदाबाद येथे झालेला हिंसाचार आणि बंगालमधील कायदा-सुव्यवस्थेची ढासळलेली स्थिती हे देखील पराभवाचे प्रमुख कारण मानले जात आहे. मतदानाच्या विविध टप्प्यांवर झालेली हिंसा आणि मतदारांना धमकावल्याच्या तक्रारींमुळे सर्वसामान्य जनतेमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. शांतता आणि सुरक्षिततेसाठी मतदारांनी भाजपच्या 'डेव्हलपमेंट आणि सुरक्षा' अजेंड्याला पसंती दिली.

### बंगालमध्ये ओवेसी 'फ्लॉप'!

4 पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठा धक्का बसला आहे तो असादुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएमआयएम पक्षाला. बिहारमधील यशाची पुनरावृत्ती बंगालमध्ये करण्याचे ओवेसींचे स्वप्न ममता बॅनर्जी यांच्या बालेकिल्ल्यातील, भाजपाच्या लाटेत लाटेत पूर्णपणे वाहून गेले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत ५ जागा जिंकून 'किंगमेकर' ठरणाऱ्या असादुद्दीन ओवेसींच्या जादूचा बंगालमध्ये सपशेल 'खेला' झाला आहे. मुर्शिदाबाद, मालदा आणि उत्तर दिनाजपूर या मुस्लिम बहुल जिल्ह्यांमध्ये मोठा प्रभाव पाडण्याचा दावा करणाऱ्या एमआयएमआयएम ला एकाही जागेवर साधे खातेही उघडता आले नाही. उलट, अनेक जागी त्यांच्या उमेदवारांची अनामत रक्कम जप्त होण्याची वेळ आली आहे.ओवेसींनी बंगालमध्ये सुमारे २५ महत्वाच्या जागांवर उमेदवार उभे केले होते. पण, हाती काय लागले, तर - शून्य जागा.

## बारामतीत सुनेत्रा पवारांचा विक्रमी विजय

जन सम्राट टाईम्स

**बारामती | प्रतिनिधी:** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या उमेदवार सुनेत्रा अजित पवार यांनी विक्रमी कामगिरी करत दणदणीत विजय मिळवला आहे. तब्बल २ लाख १८ हजार ९३० मताधिक्याने त्यांनी विजय मिळवत देशातील सर्वाधिक मताधिक्याचा विक्रम आपल्या नावावर केल्याचा दावा करण्यात येत आहे. या विजयासह त्यांनी २०१९ मधील माजी आमदार अजित पवार यांच्या मताधिक्याचाही विक्रम मोडला आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या विरोधातील उमेदवारांना हजाराच्याही आत मते मिळाल्याचे चित्र समोर आले असून हा विजय अधिकच लक्षवेधी ठरला आहे. देशपातळीवरील विक्रमाचा दावा यापूर्वी सुनील कुमार शर्मा यांनी २०२२ मध्ये २ लाख १४ हजार ८३५ मताधिक्याने विजय मिळवला होता. मात्र, सुनेत्रा पवारांनी तो विक्रम मागे टाकल्याचे सांगितले जात आहे.

**पार्थ पवारांचा संयमाचा संदेश**

विजयानंतर पार्थ पवार यांनी माध्यमांशी संवाद साधताना कार्यकर्त्यांना संयम राखण्याचे आवाहन केले. "आजचा दिवस आनंदाचा असला तरी जल्लोष टाळावा. आचारसंहिता संपल्यानंतर जनतेसाठी 'जनता दरबार' आयोजित करू," असे त्यांनी स्पष्ट केले.

**"हा शेवट नाही, नव्या बारामतीची सुरुवात"**

विजयानंतर सुनेत्रा पवार यांनी बारामतीकरांचे आभार मानत हा विजय "आदरणीय दादांच्या स्मृतींना समर्पित" असल्याचे म्हटले. "हा शेवट नसून नव्या बारामतीच्या विकासाचा प्रारंभ आहे," असे सांगत त्यांनी विकासाचा ठाम विश्वास व्यक्त केला. त्याचबरोबर, कार्यकर्त्यांनी मिरवणुका, गुलाल उधळणे टाळून संयम राखावा, असे आवाहनही त्यांनी केले.

**बारामतीकरांचा स्पष्ट कौल**

या निकालातून बारामतीकरांनी मोठ्या विश्वासाने सुनेत्रा पवारांना पाठिंबा दिल्याचे स्पष्ट झाले आहे. पोटनिवडणुकीतील हा निकाल केवळ स्थानिक राजकारणापुरता मर्यादित न राहता राज्य आणि देशाच्या राजकारणातही चर्चेचा विषय ठरला आहे.



### अमित शाह यांचा व्हिडिओ व्हायरल आणि भाजपचा उत्साह

भाजपच्या या ऐतिहासिक विजयानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा एक जुना व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये एडिटिंग, मिक्सिंग करून तो आता व्हायरल होत आहे. याच व्हिडीओत त्यांनी काही दिवसांपूर्वी, "दीदी, टाटा बाय-बाय!" चे भाकीत केले होते. या व्हिडीओत शाह यांनी बंगालमधील कार्यकर्त्यांच्या संघर्षाचे कौतुक केले होते. आता, "हा विजय बंगालच्या अस्मितेचा आणि विकासाचा आहे," अशी शाह यांची प्रतिक्रिया आहे. या जुन्या व्हिडिओने निकालानंतर भाजप कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह भरला असून, दिल्लीपासून कोलकात्यापर्यंत जल्लोषाचे वातावरण आहे.

### थलपती विजय यांचा पक्ष पहिल्या क्रमांकावर

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत थलपती विजय यांच्या TVK पक्षाने पहिल्याच प्रयत्नात १०८ जागांवर आघाडी घेतली आहे. सध्या ते सिंगल लार्जेस्ट पार्टी म्हणून उदयास येतील अशी चर्चा आहे. वाढत्या आकडेवारीसोबत सेलिब्रेशन करताना दिसत आहेत. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभिनेता थलपती विजय यांच्या पक्षाने बाजी मारली आहे. समोर आलेल्या आकडेवारीनुसार त्यांच्या तमिळगा वेट्री कळगम पक्षाने २३४ पैकी १०८ जागांवर आघाडी मिळवली आहे. लक्षवेधी बाब म्हणजे TVK पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे.


थलपति विजय : दुसरे एनटीआर!


बंगालमध्ये पहिल्यांदाच भाजप सत्तेवर येण्याच्या तयारीत आहे. पार्श्वभूमीवर, भाजप कार्यालयात असलेले जल्लोषाचे वातावरण.


बंगालमध्ये पहिल्यांदाच भाजप सत्तेवर येण्याच्या तयारीत आहे. पार्श्वभूमीवर, भाजप कार्यालयात असलेले जल्लोषाचे वातावरण.


मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची 15 वर्षांची सत्ता गेली कळल्यावर तृणमूल काँग्रेस कार्यकर्ता


बंगाल, आसाममध्ये मोदींची जादू चालली!


जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## हज यात्रेकरूंना मोठा दिलासा! मक्का-मदिनेसह संपूर्ण सौदी फिरण्यास मुभा

### सौदी सरकारचा ऐतिहासिक निर्णय; भारतीय भाविकांसाठी पर्यटन व संविधानाच्या अनेक पैलूंमध्ये बाबासाहेबांचा प्रभाव

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली/रियाध :** सौदी अरेबिया सरकारने हज यात्रेकरूंसाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. आता भारतासह जगभरातून येणाऱ्या हज यात्रेकरूंना मक्का आणि मदिना या पवित्र शहरांशिवाय सौदी अरेबियातील इतर कोणत्याही शहराला भेट देण्याची परवानगी देण्यात आली आहे. सौदी मोमेंट्स आणि सौदी अरेबियाच्या हज आणि उमराह मंत्रालयाने तशी अधिकृत माहिती जारी केली आहे. भारतीय हज यात्रेकरूंसाठी ही अतिशय आनंदाची बातमी आहे. हज यात्रेसाठी सौदी अरेबियात जाणाऱ्या भारतीय भाविकांसाठी यंदाची यात्रा अधिक संस्मरणीय ठरणार आहे. सौदी सरकारने आपल्या व्हिसा नियमांमध्ये मोठा बदल केला असून, आता यात्रेकरूंना केवळ धार्मिक स्थळांपुरते मर्यादित न राहता संपूर्ण देश फिरण्याची मुभा दिली आहे. या निर्णयामुळे वर्षानुवर्षे चालत आलेली भौगोलिक निर्बंधांची परंपरा आता संपुष्टात आली आहे. आतापर्यंत हज व्हिसावर येणाऱ्या यात्रेकरूंना केवळ मक्का, मदिना आणि जेद्दाह या तीनच शहरांमध्ये प्रवासाची परवानगी होती. या



व्यतिरिक्त इतर शहरांत जाणे हा कायदेशीर गुन्हा मानला जात असे. मात्र, 'व्हिजन २०३०' अंतर्गत सौदी अरेबियाने हे निर्बंध हटवले आहेत. आता भारतीय यात्रेकरू रियाध, दम्माम, अल-उला किंवा ताबुक यांसारख्या ऐतिहासिक आणि आधुनिक शहरांनाही भेट देऊ शकणार आहेत.नातेवाईकांची भेट: सौदी अरेबियात लाखो भारतीय नागरिक नोकरी किंवा व्यवसायानिमित्त रियाध, दम्माम आणि खोबार यांसारख्या शहरांत राहतात. या नव्या नियमामुळे हजसाठी गेलेले भारतीय भाविक आता तिथे राहणाऱ्या आपल्या नातेवाईकांना सहज भेटू शकतील.

*ऐतिहासिक पर्यटन: मदिनापासून जवळच असलेले 'अल-उला' हे जागतिक वारसा स्थळ आता भारतीयांना पाहता येईल.

* वाहतुकीची सोय: यात्रेकरू आता देशांतर्गत विमान सेवा किंवा 'हरामईन हाय-स्पीड रेल्वे'चा वापर करून इतर शहरांचा प्रवास करू शकतील.

### यात्रेकरूंसाठी महत्त्वाच्या सूचना

१. व्हिसा वैधता: हा बदल हज व्हिसाच्या वैधतेच्या कालावधीतच लागू असेल.
२. नुसुक ॲप: यात्रेकरूंना त्यांच्या प्रवासाचे नियोजन आणि परवानग्यांसाठी 'नुसुक' या अधिकृत प्लॅटफॉर्मचा वापर करावा लागेल.
३. परतीचा प्रवास: प्रवासाचे नियोजन करताना यात्रेकरूंना त्यांच्या परतीच्या विमानाचे वेळापत्रक (भारतात परतण्याची तारीख) पाळावे लागेल. सौदी अरेबियाच्या या निर्णयामुळे हज यात्रा आता केवळ धार्मिक विधींपुरती मर्यादित न राहता, भारतीय यात्रेकरूंना त्या देशाची संस्कृती आणि तिथल्या आपल्या लोकांशी जोडण्याची एक मोठी संधी ठरणार आहे.

## देशात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच डावे सत्तेतून हद्दपार!

जन सम्राट टाईम्स

**तिरुवनंतपुरम | प्रतिनिधी** केरळ निवडणुकीच्या निकालांनी भारतीय राजकारणातील एका मोठ्या युगाचा अंत झाल्याचे संकेत दिले आहेत. विधानसभा निवडणूक निकालात, केरळात काँग्रेसप्रणित 'यूडीएफ' । आघाडीने बहुमताचा आकडा पार केला आहे. विशेष म्हणजे, या निकालामुळे स्वातंत्र्यानंतर भारतीय राजकारणात पहिल्यांदाच अशी स्थिती निर्माण झाली आहे की, देशातील एकाही राज्यात डाव्यांचे सरकार उरलेले नाही. पश्चिम बंगाल (२०११) आणि त्रिपुरा (२०१८) नंतर केरळ हा डाव्यांचा शेवटचा आश्रय होता. आजच्या पराभवामुळे भारतीय संसदीय लोकशाहीत डाव्या पक्षांना आता आपल्या अस्तित्वासाठी पुन्हा शून्यापासून संघर्ष करावा लागणार आहे. हे सत्तांतर केवळ केरळपुरते मर्यादित नसून, राष्ट्रीय राजकारणावर याचे मोठे परिणाम होणार आहेत. केरळ हा डाव्या चळवळीचा आणि विचारधारेचा सर्वात भक्कम बालेकिल्ला मानला जात असे. मात्र, आजच्या निकालांनी ५० वर्षांचा राजकीय इतिहास पुसून टाकला आहे. आता केरळमध्येही 'लाल बावटा' खाली उतरताना दिसत असल्याने, भारत आता 'लेफ्ट-मुक्त' झाला आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.केरळात सत्तापालटाची प्रमुख कारणे १. अँटी-इन्कंबन्सी (सत्ताविरोधी लाट): सलग दोन वेळा सत्तेत राहिल्यानंतर डाव्या आघाडीविरुद्ध मतदारांमध्ये नाराजी होती. २. काँग्रेसची आक्रमक रणनीती: राहुल गांधींचा केरळमधील प्रभाव आणि स्थानिक नेत्यांनी दिलेला लढा काँग्रेससाठी फायद्याचा ठरला.

» Selected

### डीआरपी सीईओंची डीबीए शिष्टमंडळासोबत सकारात्मक चर्चा

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्प/ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ( डीआरपी/ एसआरए) प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी धारावी बचाव आंदोलनाच्या (डीबीए) शिष्टमंडळासोबत सोमवारी सकारात्मक चर्चा केली. धारावीमध्ये आयोजित केलेल्या मोर्चानंतर पार पडलेल्या या बैठकीत अनेक महत्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. स्थानिकांच्या अल्प प्रतिसादात पार पडलेल्या या मोर्चात विविध राजकीय पक्षांच्या (धारावी बाहेरील) कार्यकर्त्यांनी हजेरी लावली. तरीही, सुमारे 200 ते 250 जण या मोर्चाला उपस्थित असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींकडून मिळाली.

धारावीतील बिस्मिल्लाह हॉटेल जवळून सुरू झालेला हा मोर्चा धारावी पोलिस स्टेशनवरून 90 फीट रोडपर्यंत नेण्यात आला. काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड, आमदार ज्योती गायकवाड,विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे, उबाठाचे माहिमचे आमदार महेश सावंत यांच्या शिष्टमंडळाने मोर्चानंतर डीआरपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीबाबत बोलताना डॉ. कल्याणकर यांनी सांगितले.

# नवापूरात 'बर्ड फ्लू'चा कहर!

## लाखो कोंबड्यांच्या कत्तलीला सुरुवात, प्रशासन युद्धपातळीवर; शेतकरी हतबल

जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार | प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात 'बर्ड फ्लू' (एव्हियन इन्फ्लूएंझा) चा उद्रेक झाल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. 'पोल्ट्री हब' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भागात काही दिवसांतच शेकडो कोंबड्यांचा मृत्यू झाल्यानंतर परिस्थिती गंभीर बनली असून प्रशासनाने तातडीने "कलिंग ऑपरेशन" सुरू केले आहे. भोपाळ येथील राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग संस्थेच्या (NIHSAD) अहवालात बर्ड फ्लूची पुष्टी झाल्यानंतर जिल्हा प्रशासन, पशुसंवर्धन विभाग आणि आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. बाधित परिसराच्या एक किलोमीटर परिघातील सर्व पोल्ट्री फार्ममध्ये कोंबड्यांच्या कत्तलीची प्रक्रिया वेगाने सुरू असून, लाखो कोंबड्यांचा नायनाट केला जात आहे. शेतकऱ्यांचा संसार उद्ध्वस्त महिनोनमहिने मेहनत घेऊन वाढवलेल्या कोंबड्या काही तासांत नष्ट होत असल्याने पोल्ट्री व्यावसायिक हतबल झाले आहेत. "डोळ्यांदेखत




सर्व काही संपताना पाहतोय," अशा भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या. लाखो रुपयांचे नुकसान होत असल्याने आर्थिक संकटाचे मोठे सावट निर्माण झाले आहे. कडक उपाययोजना आणि निर्जंतुकीकरण प्रशासनाने बाधित भागात मोठ्या प्रमाणावर निर्जंतुकीकरण मोहीम हाती घेतली आहे. PPE किट परिधान केलेले कर्मचारी कोंबड्यांचे संकलन करून त्यांची सुरक्षित विल्हेवाट लावत आहेत. पोलिस बंदोबस्तात संपूर्ण प्रक्रिया पार पडत असून, संसर्ग रोखण्यासाठी काटेकोर खबरदारी घेतली जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा इशारा कलिंग प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे. कोंबड्या काही तासांत नष्ट होत असल्याने पोल्ट्री व्यावसायिक हतबल झाले आहेत.

"डोळ्यांदेखत सर्व काही संपताना पाहतोय," अशा भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या. तसेच, कोणतीही माहिती लपवणाऱ्या पोल्ट्री चालकांवर कायदेशीर कारवाई होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. बाजारपेठेवर परिणाम, नागरिकांमध्ये भीती या उद्रेकामुळे चिकन व अंड्यांच्या विक्रीवर मोठा परिणाम झाला आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असल्याने पोल्ट्री उत्पादनांकडे ग्राहकांचा ओढा कमी झाला आहे.

### पोल्ट्री उद्योगावर मोठे संकट

नवापूर तालुक्यातील पोल्ट्री व्यवसाय हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधार आहे. मात्र वारंवार होणाऱ्या बर्ड फ्ल्यूच्या संकटामुळे हा उद्योग कोलमडण्याच्या मार्गावर आहे. प्रशासन संसर्ग रोखण्यासाठी प्रयत्न करत असताना, शेतकरी मात्र आर्थिक अनिश्चिततेच्या गर्तेत सापडले आहेत. नवापूरमधील ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून, पुढील काही दिवस निर्णायक ठरणार आहेत.

## ग्रामरोजगार सहाय्यकांना दरमहा ठोस वेतन द्या; थकीत देयकांसाठी आंदोलन तीव्र

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी :** राज्यातील ग्रामरोजगार सहाय्यकांना दरमहा निश्चित वेतन आणि टी.ए./ डी.ए. वेळेत मिळावे, या प्रमुख मागणीसाठी राज्य ग्रामरोजगार सहाय्यक संघटना आक्रमक झाली असून, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांच्याकडे जिल्हाध्यक्ष सुरेश पाटोळे यांनी ठोस मागण्यांचे निवेदन सादर केले आहे. शासनाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी काढलेल्या निर्णयानुसार ग्रामरोजगार सहाय्यकांना दरमहा १० हजार रुपयांचे निश्चित मानधन देण्याचा आदेश देण्यात आला होता. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापही न झाल्याने राज्यभरातील सहाय्यकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मागील तब्बल १९ महिन्यांचे थकीत मानधन मिळावे, या मागणीसाठी १ एप्रिल २०२६ पासून कामबंद आंदोलन



सुरू करण्यात आले आहे. या आंदोलनाची दखल घेत जि.प. सीईओ करिश्मा नायर यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. प्रलंबित मागण्यांबाबत संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांशी सविस्तर संवाद साधून मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला जाईल, तसेच या प्रश्नाकडे विशेष लक्ष दिले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. सीईओंकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने ग्रामरोजगार सहाय्यकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. "न्याय मिळेल" या विश्वासाने संघटनेच्या सदस्यांमध्ये समाधानाची भावना दिसून येत आहे. निवेदन सादर करताना जिल्हाध्यक्ष सुरेश पाटोळे यांच्यासह भुषण महाजन, सूर्यभान पाटील, सचिन पाटील, भरत राठोड, प्रदीप राजपूत, शिवाजी हटकर, उत्तम पाटील, अनिल पाटील, योगेश पाटील आदी पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, शासनाने लवकरात लवकर निर्णयाची अंमलबजावणी करून थकीत मानधन वितरित करावे, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## 'कुर्मी जोडो अभियान'ची घोषणा; समाज एकतेसाठी व्यापक उपक्रम

### रायगडावर शुभारंभ, 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' येथे सांगता

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभा, महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने "कुर्मी जोडो अभियान" राबविण्याची घोषणा करण्यात आली असून, समाज एकता आणि बंधुभाव दृढ करण्यासाठी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. ६ जून २०२६ ते १५ ऑगस्ट २०२७ या कालावधीत हे अभियान राज्यभर राबविण्यात येणार आहे.

अभियानाचा शुभारंभ रायगड किल्ला येथे होणार असून सांगता स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनाचे तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ऐतिहासिक कार्याच्या स्मरणार्थ या अभियानाला प्रेरणा देण्यात आली आहे.

या अभियानाचा मुख्य उद्देश कुर्मी समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे, त्यांच्यातील एकात्मतेची भावना दृढ करणे आणि समाजातील महापुरुषांचे विचार पुढे नेणे हा आहे. विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या समाजघटकांमध्ये "आपण एकच आहोत" ही जाणीव निर्माण करणे हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे. या १४ महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, युवक व महिला सक्षमीकरण कार्यक्रम, शैक्षणिक मार्गदर्शन शिबिरे आणि सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले जाणार आहेत.

तसेच निबंध व वक्तृत्व स्पर्धा, पथनाट्य, डिजिटल माध्यमातून जनजागृती आणि कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान सोहळा यांचाही समावेश असेल.




### सामाजिक एकात्मता वाढण्यास चालना

अभियानाबाबत बोलताना प्रदेशाध्यक्ष संजय पाटील, प्रदेश महासचिव जयेश शेलार पाटील आणि कोषाध्यक्ष संदीप काळे पाटील यांनी सांगितले की, "हे अभियान केवळ कार्यक्रम नसून समाजाला एकत्र आणण्याचा, त्याची ओळख मजबूत करण्याचा आणि पुढील पिढीसाठी दिशा ठरवण्याचा व्यापक प्रयत्न आहे." विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या समाजघटकांमध्ये "आपण एकच आहोत" ही जाणीव निर्माण करणे हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे. सामाजिक एकात्मता वाढण्यास चालना मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## मुंबई पलटणने मारली बाजी

जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी :** | आज मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स विरुद्ध लखनौ सुपर जायंट्समध्ये सामना पार पडला. आज पलटणचे नेतृत्व सूर्यकुमार यादव करत आहे. त्याने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र तो निर्णय काहीसा महागडा ठरला असे पाहायला मिळाले. एलएसजीने प्रथम फलंदाजी करून मुंबई इंडियन्सला 229 रन्सचे टार्गेट दिले होते. अखेर या सामन्यात मुंबई इंडियन्सने एलएसजीचा 6 विकेट्सने पराभव केला आहे. मुंबईने या हंगामातील आपला तिसरा विजय मिळवला आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात मुंबईला यश प्राप्त झाले आहे. एलएसजीने दिलेल्या 229 रन्सचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सकडून रियान रिकल्टन आणि रोहित शर्मा सलामीला खेळण्यासाठी मैदानात उतरले. रोहित शर्मा आणि रियान रिकल्टनने मुंबई इंडियन्सला पॉवर प्लेमध्ये चांगली सुरूवात करून दिली.

मुंबई इंडियन्सकडून रियान रिकल्टनने आणि रोहित शर्माने चांगली सुरुवात केली. पॉवर प्लेमध्ये मुंबई इंडियन्सने धमाकेदार सुरुवात केली. रोहित शर्मा आणि रियान रिकल्टनने शतकी भागीदारी केली. या दोघांनी दणक्यात सुरुवात करून मुंबई इंडियन्सचा विजयाचा पाया रचला.

## नसरापूर प्रकरणावर संताप: आरोपीला वकीलपत्र न देण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी :** भोर तालुक्यातील नसरापूर येथे अल्पवयीन बालिकेवर झालेल्या अमानुष अत्याचार व खून प्रकरणामुळे राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) पुणे शहराच्या वतीने आरोपीविरोधात कठोर भूमिका घेत पुणे बार असोसिएशनच्या अध्यक्षांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात आरोपीला कोणत्याही वकिलांनी वकीलपत्र स्वीकारू




नये, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच या गंभीर प्रकरणात न्यायालयाने जलदगतीने सुनावणी करून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा, विशेषतः मृत्युदंडाची शिक्षा ठोठावावी, अशी ठाम भूमिका शिवसेनेने मांडली. पुणे बार कौन्सिल असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काळूराम भुजबळ यांना हे निवेदन देताना शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये पुणे शहर समन्वयक शंकर संगम, श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनेचे शहर प्रमुख रोहित उर्फ बापू कसबेकर, पुणे जिल्हा शिक्षक सेनेचे जिल्हाप्रमुख अनिल गडकरी, उपशहर प्रमुख सुनील जाधव, संजय डोंगरे, शहर संघटक अनिल बटाने, निलेश जगताप, मागासवर्गीय शहर प्रमुख महेंद्र गायकवाड यांचा समावेश होता. या घटनेमुळे समाजात तीव्र अस्वस्थता निर्माण झाली असून, महिलांच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दोषींना कठोर शिक्षा मिळावी आणि अशा घटनांना आळा बसावा, यासाठी सर्व स्तरातून मागणी जोर धरत आहे.

## पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर नियम मोडणाऱ्यांवर कारवाईचा बडगा

जन सम्राट टाईम्स

**पिंपरी | प्रतिनिधी :** महाराष्ट्र दिनी दिमाखात लोकांसाठी खुला झालेला मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्प सध्या सेल्फी आणि रिल्स बनवणाऱ्यांच्या विळख्यात सापडला आहे. जगातील सर्वात रुंद बोगदा आणि देशातील सर्वात उंच केबल-स्टेड पूल पाहण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत असून, सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून फोटो काढणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. मात्र, याच ठिकाणी पिंपरी-चिंचवडच्या महापौरांनी धावत्या प्रवासात वाहन थांबवून फोटो काढल्याने, "नियम फक्त सामान्यांसाठीच का?" असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

सोमवारी पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील एका महत्त्वाच्या बैठकीसाठी मुंबईला जात होते. यावेळी मिसिंग लिंकवरून जात असताना पुलाच्या भव्यतेमुळे त्यांनी वाहन थांबवून छायाचित्रे काढली. ही छायाचित्रे त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत प्रकल्पाचे कौतुक केले. "विकास केवळ दिसत नाही, तो प्रत्येक प्रवासात जाणवतो," अशी भावना त्यांनी व्यक्त केली. मात्र, ज्या ठिकाणी सामान्य वाहनचालकांना थांबण्यास बंदी आहे, तिथे लोकप्रतिनिधीनेच नियम मोडल्याने वादाला तोंड फुटले आहे. प्रकल्प सुरू झाल्याच्या पहिल्याच दिवशी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २० वाहनचालकांवर महामार्ग पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली होती. महामार्गावर ताशी १०० ते १२० किमी वेगाने वाहने धावत असल्याने, अशा हाय-स्पीड कॉरिडॉरमध्ये वाहन थांबवणे अपघाताला निमंत्रण देणारे ठरू शकते. तरीही सलग चौथ्या दिवशी येथे सेल्फी घेणाऱ्यांची गर्दी कायम होती.महापौरांच्या पोस्टवर नेटकऱ्यांनी टीकेची झोड उठवली आहे. पोलिसांनी यापूर्वीच येथे थांबणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर महापौरांवर कारवाई होणार का, असा प्रश्न विचारला जात आहे.


## क्रिकेट खेळताना कोसळला मृत्यूचा स्लॅब

### 10 वर्षीय रणवीरचा दुर्दैवी अंत

जन सम्राट टाईम्स

यावल | प्रतिनिधी : यावल शहरातील छत्रपती शिवाजी नगर परिसरात घडलेल्या हृदयद्रावक घटनेत 10 वर्षीय रणवीर जगदीश गायकवाड याचा मृत्यू झाला. मित्रांसोबत क्रिकेट खेळत असताना शेजारील जीर्ण घराचा स्लॅब अचानक कोसळून त्याच्या अंगावर पडल्याने हा दुर्दैवी अपघात घडला. या घटनेने संपूर्ण शहर शोकमग्न झाले आहे. शनिवारी दुपारच्या सुमारास गल्लीत नेहमीप्रमाणे मुलांचा क्रिकेटचा खेळ सुरू होता. रणवीरही उत्साहाने खेळात सहभागी झाला होता.

मात्र, खेळ सुरू असतानाच शेजारील मोडकळीस आलेल्या घराच्या पोर्चाचा स्लॅब अचानक कोसळला आणि रणवीर ढिगाऱ्याखाली अडकला. काही क्षणांतच आनंदाचे वातावरण आक्रोशात बदलले. तातडीने रुग्णालयात हलवले, पण प्रयत्न निष्फळ घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत रणवीरला ढिगाऱ्यातून बाहेर काढले. गंभीर जखमी अवस्थेत त्याला भुसावळ येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मित्र आणि कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर रणवीरच्या अकाली मृत्यूने त्याच्या कुटुंबावर दुःखाचा



डोंगर कोसळला आहे. "आत्ताच आमच्यासोबत खेळत होता," असे म्हणताना त्याच्या मित्रांचे डोळे पाणावले. परिसरात शोककळा पसरली असून खेळणारी गल्ली ओस पडली आहे. या घटनेने संपूर्ण शहर शोकमग्न झाले आहे. शनिवारी दुपारच्या सुमारास गल्लीत नेहमीप्रमाणे मुलांचा क्रिकेटचा खेळ सुरू होता. रणवीरही उत्साहाने खेळात सहभागी झाला होता. मात्र, खेळ सुरू असतानाच शेजारील मोडकळीस आलेल्या घराच्या पोर्चाचा स्लॅब अचानक कोसळला आणि रणवीर ढिगाऱ्याखाली अडकला. काही क्षणांतच आनंदाचे वातावरण आक्रोशात बदलले. तातडीने रुग्णालयात हलवले, पण प्रयत्न निष्फळ घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत रणवीरला ढिगाऱ्यातून बाहेर काढले. निष्काळजीपणाचा मुद्दा ऐरणीवर या घटनेनंतर शहरातील जीर्ण व धोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वेळेत दखल घेतली असती तर हा अपघात टळला असता का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## पुण्यात तितिक्षा नाट्य कला साहित्य संमेलनाची रंगत

### साहित्य, नाट्य आणि संस्कृतीचा संगम; राज्यभरातील साहित्यिक-कलावंतांचा उत्स्फूर्त सहभाग

जन सम्राट टाईम्स

पुणे | प्रतिनिधी : तितिक्षा भावार्थ सेवांतर्गत तितिक्षा इंटरनॅशनल पुणे आयोजित तितिक्षा नाट्य कला साहित्य संमेलन, पुस्तक प्रकाशन आणि पुरस्कार वितरण सोहळा १ मे २०२६ रोजी भारत इतिहास संशोधक मंडळ, सदाशिव पेठ येथे उत्साहात पार पडला. विविध साहित्यिक, कवी, नाट्यकलावंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा सोहळा साहित्यिक मेळाव्याचा अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाला सुभाष सोनवणे, जयंत भिडे, सुजित दातार आणि निलेश दातार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच योगेश सुपेकर, अशोक रास्ते, ज्ञानेश्वर कोटगिरे, ॲड. प्रतिभा पोतदार, प्रशांत डोंगरे आदी मान्यवरांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. संमेलनात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना तितिक्षा पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पर्यावरण संवर्धन, समाजसेवा, साहित्य आणि कला क्षेत्रातील योगदानासाठी अनेक मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे, ज्ञानेश्वर कोटगिरे यांना 'तितिक्षा कानन



संवर्धन पुरस्कार', तर प्रशांत डोंगरे यांना 'पर्यावरण संवर्धन पुरस्कार' प्रदान करण्यात आला. याचबरोबर 'तितिक्षा ग्रंथ पुरस्कार २०२६' अंतर्गत विविध साहित्यप्रकारांतील उत्कृष्ट पुस्तकांचा गौरव करण्यात आला. प्रा. जयंत खेडकर यांच्या 'चला गणित शिकूया' या ग्रंथमालेला सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार मिळाला. आत्मचरित्र, चरित्र, कादंबरी, कथासंग्रह, बालसाहित्य आणि कवितासंग्रह अशा विविध विभागांत अनेक साहित्यिकांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात 'श्रीराम गाथा' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे तसेच 'डहाळी' या अनियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. विविध काव्य आणि साहित्य स्पर्धांतील विजेत्यांचाही गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रमोद कुलकर्णी, विजय सातपुते आणि प्रिया दामले यांनी केले, तर आयोजनात अजिता मुळीक, भालचंद्र शिर्के आणि तितिक्षा परिवाराचे मोलाचे योगदान राहिले. विविध साहित्यिक, कवी, नाट्यकलावंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा सोहळा साहित्यिक मेळाव्याचा अविस्मरणीय ठरला. या संमेलनामुळे साहित्य, कला आणि संस्कृतीचा संगम अनुभवायला मिळाला असून, उपस्थित साहित्यप्रेमींनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.